# रासलीला

## अनुक्रमणिका

- मनोगत ६
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ७
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ८ अ
- ज्ञान-प्राप्तकर्त्या साधिकेचा परिचय ८ आ

१. 'रास' शब्दाची व्युत्पत्ती व अर्थ ९
२. भगवंताच्या रासलीलेचे वर्णन असलेले श्रीमद्‌भागवत पुराण ९
३. रासलीलेची पार्श्वभूमी : गोपींची मधुराभक्ती १२
    ३ अ. मधुराभक्तीचा अर्थ १२
    ३ आ. मायेतील मीलन व मधुराभक्तीतून साध्य होणारे अद्वैत १२
    ३ इ. महत्त्व १३
    ३ ई. गोपी १३
    ३ उ. राधा १९
    ३ ऊ. गोपी व राधा २७
    ३ ए. संत मीराबाई २९
    ३ ऐ. मधुराभक्ती करणाऱ्या जिवाची साधना ३२
    ३ ओ. टप्पे ३३
    ३ औ. मधुराभक्ती करणाऱ्यांची उदाहरणे ३३
४. रासलीलेचा प्रसंग ३३
५. महत्त्व ३७
६. रासलीला समजून घेणे ३८
    ६ अ. बुद्धीने समजेल असे उत्तर ३८
    ६ आ. रासलीला कधी समजते ? ४१
    ६ इ. देवता व रासलीला ४३

६ ई. श्रीकृष्णाची वैशिष्ट्ये ४४
६ उ. रासलीलेचे गोपींवर झालेले परिणाम ४५
७. मधुराभक्ती व रासलीला या माध्यमांतून गोपींची मोक्षापर्यंतची वाटचाल ४८
७ अ. विविध पातळीला गोपींची झालेली उन्नती ४८
७ आ. श्रीकृष्णाने टप्प्याटप्प्याने स्वतः जाऊन गोपींना जीवदशेतून शिवात्मा दशेत नेणे ५०
७ इ. श्रीकृष्णाने गोपींना सगुणाकडून निर्गुणाकडे टप्प्याटप्प्याने नेणे ५१
७ ई. श्रीकृष्णाने रासलीलेद्वारे प्रत्येक गोपीत नसलेले गुण निर्माण करून तिला अद्वैताची अनुभूती देण्याची प्रक्रिया ५४
७ उ. श्रीकृष्ण साक्षात ईश्‍वर असल्याने त्याच्याशी एकरूप झाल्यावर गोपींना सायुज्य मुक्ती न मिळता मोक्ष मिळणे ५४
८. श्रीकृष्णाशी एकरूप होतांना गोपींना आलेल्या अनुभूती ५४
९. रासलीलेचा भावार्थ ५५
१०. रासलीलेचे सार ५६
१० अ. उन्नत व ऋषी स्वतः रासलीला करू न शकण्याची कारणे ५६
१० आ. गोपी रासलीला करू शकण्याची कारणे ५६
१० इ. श्रीकृष्ण रासलीला करू शकण्याची कारणे ५६
१० ई. रासलीला कोण करू शकतो ? ५७
११. रासलीलेबाबत श्रीकृष्णाची शिकवण ५८
१२. रासलीलेबद्दल विकल्प येणे, हेही पापच असणे ६०
१३. रासनृत्याचे प्रकार ६०
१४. श्रीकृष्णावरील प्रेमामुळे साधकांना आलेल्या अनुभूती ६१
१५. मायावी मांत्रिकांची व श्रीकृष्णाची रासलीला ७१
१६. क्षात्रधर्म साधना हीसुद्धा एक रासलीलाच ! ७४

# मनोगत

रासलीला म्हटले की, शरद ऋतूतील पौर्णिमेच्या चांदण्या रात्री श्रीकृष्णाने राधा व गोपी यांसह मांडलेल्या रासोत्सवाचे विलोभनीय दृश्य डोळ्यांसमोर येते. श्रीमद्‌भागवत पुराणात महर्षी व्यासांनी वर्णन केल्याप्रमाणे त्या रात्री हा रासोत्सव सुरू झाला, तो दिशा प्रकाशेपर्यंत अविरत चालला. साक्षात भगवंताबरोबरचा तो रास किती अद्वितीय असेल, याची खरेतर शब्दांत मांडणी करता येत नाही. गोपींच्या भक्तीला 'आदर्श भक्ती'ची उपमा दिली जाते. मोहमायेपासून विरक्त असलेल्या गोपींची व भगवंत श्रीकृष्णाची रासलीला किती पवित्र असेल !

असे असूनही कलीयुगात रासलीलेकडे संशयाने पाहिले जाते. एवढेच नव्हे, तर भगवंताने गोपींशी केलेली क्रीडा काहींना अधर्मयुक्त वाटते. ज्याने ही माया निर्माण केली, तो साक्षात भगवंत असे करू शकेल का ? आताच्या काळात रंगपंचमी, तसेच नवरात्रोत्सवातील गरबा विकृत स्वरूपात खेळले जात असून त्यामध्ये व्यभिचार होत आहे. रासलीलेचा भावार्थ समजून न घेता आज तिचे विकृत दर्शन घडवले जात असल्याने धर्ममूल्यांचा ऱ्हास होत आहे.

खरेतर रासलीलारूपी भगवंताच्या लीला, म्हणजे मायेत असूनही ब्रह्म जाणण्याची शिकवण. यासाठी मायेतही भगवंताला स्मरायला हवे.

या ग्रंथात रासलीलेचा भावार्थ काय, मधुराभक्ती म्हणजे काय, त्याचे गमक काय, त्याची फलश्रुती काय इत्यादी माहिती दिली आहे. तसेच रासलीलेबाबत प्रत्यक्ष ईश्वराकडून साधिकांना मिळालेल्या अमूल्य ज्ञानाचा आनंदही घेता येईल. रासलीलेबाबतचे गैरसमज दूर होण्यासाठी, तिचे आकलन होण्यासाठी व तिचे आध्यात्मिक महत्त्व जाणण्यासाठी या ग्रंथातील माहिती व ज्ञान यांचा उपयोग व्हावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**